# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**


**दिनांक २७.०८.२०२६ गुरुवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाठोडा :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २७.०८.२०२६ चे १३.४५ वा. चे सुमारास, वाठोडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, तरोडी गावाजवळ, हायवे आऊटर रिंग रोडवर एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विजय शामराव चन्ने वय ४९ वर्षे रा. शारदा नगर, गोपाळकृष्ण लॉन मागे, वाठोडा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०५ यांचे हद्दपार आदेश क्र. ४८/२०२५ दिनांक २५.१२.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०८.२०२६ चे १६.०० वा. ते दिनांक २७.०८.२०२६ चे ०६.४० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत सीएमपीडीआय कॉलनी, बिल्डींग क्र. बी—५, क्वॉर्टर क्र. बी/५०, नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे शेजारी नामे विकास कुमार पशुपती वय ३७ वर्ष हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन परिवारासह झारखंड येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील दोन्ही लोखंडी आलमारीतील रोख ८०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व असा एकुण किंमती ६,४८,०००/—रू. चा मुद्देमाल तसेच बिल्डींग क्र. ४, क्वॉर्टर क्र. बी—३७ येथे राहणारे विजय कुमार महतो वय ३४ वर्ष यांचे घराचे दाराचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे लॉकेट कि. १८,०००/— रु. चे असा एकूण ६,६६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी रामलाल रामेश्वर घासील वय ३८ वर्ष रा. सीएमपीडीआय कॉलनी, बिल्डींग क्र. बी—५, क्वॉर्टर क्र. बी/४८, नागपूरयांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. कल्पना कटारे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कपीलनगर :—** दिनांक १४.०८.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, मोहम्मद अली पेट्रोल पंपजवळ, कामठी रोड येथून अलीम नबी अन्सारी वय ३५ वर्ष रा. प्लॉट क्र. ९१७,

यशोधरानगर, कपीलनगर हे आपले दुचाकीने कामठीकडे जात असता, अचानक त्यांचे दुचाकी समोर गाय आडवी आल्याने, त्यांचे संतुलन बिघडून खाली पडल्याने डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांना उपचाराकरीता न्युरॉन हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.०८.२०२६ रोजी १७.०५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे मपोउपनि. शिवाली उलमाले ९२२६००३४४१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे कळमणा :—** कु. मोना कोमल चक्रधारी वय २० वर्षे, रा. प्लॉट क्र ६८, भोलेश्वर नगर, कळमणा, नागपुर ही दिनांक ३०.०७.२०२६ रोजीपासुन पोलीस ठाणे कळमणा हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, बांधा—मध्यम, उंची— ४ फुट १० इंच, केस— काळे लांब, अंगात— पांढरे रंगाची रेघाटी कुर्ती व हिरव्या रंगाचा हॉफपॅन्ट व पायात निळी चप्पल घातलेली आहे. भाषा—हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे अजनी :—** दीपक वसंतराव रामटेके वय ४६ वर्षे, रा. प्लॉट क्र १२६, जयवंत नगर, दुर्गा चौक, अजनी नागपुर हे दिनांक १४.०८.२०२६ रोजी १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. आजपावेतो घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ८ इंच, केस—काळे, अंगात— हिरवे रंगाची टिशर्ट व ग्रे रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे धंतोली :—** सौ. सोनिया अभय शेंडी वय २० वर्षे, रा. राहुल नगर, नवजीवन कॉलनी, नागपूर, ही दिनांक १६.०८.२०२६ रोजी १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेलल्या. आजपावेतो घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— पोपटी शर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात.


कु. मोना


दीपक


सौ. सोनिया

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**